<u>वार्ता टिपण. दिनांक ०९/०९/२०१७</u>

**अल्पवयिन मुलीस पुणे रेल्वे स्टेशन येथून पळवूण नेणारा गुन्हेगार प्रॉपर्टी सेल कडून दिड वर्षा नंतर जेरबंद.**

---

दिनांक ८/०९/२०१७ रोजी प्रॉपर्टी सेल गुन्हे शाखा पुणे शहर विभागाचे पोलीस निरीक्षक श्री.एस.व्ही.शिंदे हे त्यांचे स्टाफ सह कार्यालयात हजर असताना पो.ना.ब.नं.१५१२ यशवंत खंदारे यांना त्यांचे बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की,पुणे रेल्वे स्टेशन दत्त मंदिरा जवळून सुमारे दिड वर्षा पूर्वी **कु.तनिष्का सचिन कांबळे वय ३ वर्षे** या मुलीला पळवून नेण्यात आले होते.व सदर बाबत पुणे रेल्वे पो.स्टे.येथे गुन्हा दाखल असुन सदर मुलीस पळवुन नेणा-या इसमाचा फोटो व मुलीचा फोटो भित्ती पत्रकावर लावणेत आलेला होता.तसेच सदर मुलीस किंवा आरोपीचा ठाव ठिकाणा याची माहिती देणा-यास योग्य ते बक्षिस जाहिर करण्यात आलेले होते.असे आव्हान करण्यात आलेले होते.त्या पत्रकावर फोटो असणारा व मुलीस पळवून नेणारा इसम हा पुणे स्टेशन जवळील एस टी स्टॅण्ड येथे येणार असले बाबत माहिती मिळाली असता सदर माहिती त्यांनी पोलीस निरीक्षक श्री.एस.व्ही.शिंदे यांना सांगितली असता त्यांनी लागलीच त्यांचे मदतीस पोलीस स्टाफ देऊन सदर आरोपीस ताब्यात घेणे बाबत योग्य त्या सुचना दिल्या त्या नुसार सदर आरोपीस पुणे स्टेशन जवळील एस टी स्टॅण्ड येथून ताब्यात घेऊन प्रॉपर्टी सेल गुन्हे शाखा पुणे शहर या कार्यालयात आणून त्याचे कडे तपास केला असता त्याने त्याचे **नांव विजय ऊर्फ शिकारी पुरुषोत्तम शिरपूरकर वय २९ वर्षे रा.सध्या पुणे स्टेशन मूळगांव मु.पो.मांगली ता.भद्रावती जि चंद्रपूर** असा असल्याचे सांगितले तसेच सदरचा गुन्हा हा त्यानेच केला असले बाबत कबुली दिली असुन सदर आरोपीस मुलीचे आजीनेही ओळखले आहे.तसेच त्या बाबत रेल्वें पो स्टे येथे अधिक माहिती घेता त्यांचे कडे सदर बाबत रेल्वे पो स्टे गु.र.नं.९९/२०१६ भा.द.वि.क.३६३ प्रमाणे दिनांक ०३/०४/२०१६ रोजी गुन्हा दाखल असले बाबत व सदर गुन्हयातील आरोपी हा दिड वर्षा पासुन मिळून येत नसले बाबत सांगितले त्या प्रमाणे नमूद आरोपीस दाखल गुन्हयात नमूद आरोपीस निष्पन्न करुन पुढील कार्यवाही कामी वरीष्ठ पोलीस निरीक्षक रेल्वे पो स्टे यांचे ताब्यात देणेत आलेला आहे.

सदरची कार्यवाही श्री प्रदिप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त,गुन्हे,पुणे., श्री पंकज डहाणे, पोलीस उप आयुक्त,गुन्हे,पुणे. श्री सुरेश भोसले, सहा.पोलीस आयुक्त,गुन्हे-१,पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सतीश शिंदे, प्रॉपर्टी सेल, गुन्हे शाखा,पुणे शहर व स.पो.फौ.गरुड पो.ना.१५१२ यशवंत खंदारे पो हवा.अनिल उसुलकर ,अमोल भोसले,संजय जगताप,संभाजी गायकवाड यांनी केलेली आहे.